<u>नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर</u>

<u>वाचा</u> :- १) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ यांचेकडून दि.२२/९/२०११ रोजी प्राप्त झालेले कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६५/२०११/जा.८०२ दि.०५/१०/२०११.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६५/२०११/जा. ८०३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

दिनांक : ०५/१०/२०११.

## <u>अंतरीम आदेश</u>

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

मानखूर्द पोलिस ठाणेचे सहाय्यक पोलिस उप निरिक्षक श्री. अरुण पांडूरंग कदम हे दिनांक ०७/०९/२०११ रोजी त्यांच्या पथकासह मानखुर्द पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त करीत असतांना त्यांना त्यांच्या विश्वसनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, घाटकोपर मानखुर्द लिंक रोड येथून संध्याकाळी एक मोटार ट्रक रेशनिंग दुकानांवर विक्रीसाठी वापरण्यात येणारा गहू बेकायदेशिरपणे इतर ठिकाणी विक्रीसाठी घेऊन जाणार आहे. सदर बातमीच्या आधारे सुमारे १७:३० वाजता एक मोटार ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ हा संशयास्पदरित्या मंगलमूर्ती जंक्शनजवळ, घाटकोपर मानखूर्द लिंक रोड या ठिकाणी आढळून आला. सदर मोटार ट्रकची त्यांनी पहाणी केली असता, सदरच्या ट्रकमध्ये गव्हाने भरलेल्या गोणी सापडल्या. सदर बातमीदारामार्फतीने मिळालेल्या बातमीप्रमाणे शहानिशा झाल्याने सदरचा मोटार ट्रक हा ताब्यात घेऊन मानखूर्द पोलिस ठाणे अंमलदार पोलिस उप निरिक्षक श्री. चंदनशिवे यांच्या ताब्यात दिला.

तद्नंतर श्री. सुनिल रसाळ, सहाय्यक पोलिस निरिक्षक, मानखूर्द पोलिस ठाणे यांनी शिधावाटप कार्यालय क्र. ४४ ई चे शिधावाटप अधिकारी श्री. दयाराम पिराजी भानावत यांना भ्रमणध्वनीवर माहिती दिली की, मानखूर्द पोलिस ठाणे येथे टाटा ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ मध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत होणारा १२० बाचके गहू घेऊन जात असतांना पकडून ठेवला असून सदर ठिकाणी त्यांना हजर राहण्यास

0002सांगितले. सदरचे अधिकारी त्यांच्या सहकाऱ्यांसह उपस्थित राहिले असता, सदरचा ट्रक चॉकलेटी रंगाचा असून निळ्या रंगाच्या ताडपत्रीने आच्छादलेला असल्याचे त्यांना आढळले, त्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्याचा १२० बाचके गहू असल्याचे आढळून आले. सदर ठिकाणी उपस्थित असलेला ट्रकचा चालक यास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव विदेशी राममिलन गौतम असे सांगून चिता हॉटेलच्या पाठीमागे, कामराज नगर पोलिस चौकीच्या गल्लीत, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथे राहत असल्याचे सांगितले. ट्रकमधील गव्हाबाबत चालकाकडे चौकशी केली असता, त्याच्या ओळखीचे प्रदीप शेठ यांनी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधून त्याच्या ड्रायव्हरची तब्येत ठिक नसल्याने खोपोली येथील कंपनीमध्ये सदर गहू घेऊन जाण्यास सांगितले. सदर गहू घेऊन जात असतांना पोलिसांनी अडविले व मानखुर्द पोलिस ठाणे येथे घेऊन आल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर गव्हाच्या खरेदी बाबत चौकशी केली असता, गुप्ता ट्रेडिंग कंपनी, ३ कामराज नगर, जी.आर. नं. एस/२१, ईसीआय चर्च जवळ, घाटकोपर (पूर्व) येथून आणल्याचे इनव्हाईस क्रमांक २० दाखविले. ट्रकमधील गव्हाची अधिकाऱ्यांनी पहाणी केली असता, सदर गव्हाच्या गोण्यांवर भारतीय अन्न महामंडळ (एफ.सी.आय.) छापलेले आढळले. प्रस्तूत प्रकरणी जप्त केलेला मुद्देमाल मानखूर्द पोलिस ठाणे यांनी सिलबंद करुन तसा पंचनामा पोलिसांनी केलेला आहे.

अशाप्रकारे संबंधितानी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू हा अवैध मार्गाने खरेदी करुन काळ्याबाजाराने विक्री करण्याकरिता घेऊन जात असल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व ९ २) दि बॉम्बे रेशनिग एरिया शेडयुल्ड कमोडीटीज (रेग्यूलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर १९८६ चे कलम ४, ५, ६, ७ व ८ तसेच ३) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) रेग्युलेशन १९६६ चे कलम १८(३)(एएए) चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द मानखुर्द पोलिस ठाणे, मुंबई येथे स्था. गु. क्र. ११२९/२०११ दि.१७/०९/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टाटा कंपनीचा मोटार ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ | १ नग | ५,००,०००/- |
| २ | उक्त ट्रकमधील १२० बाचके गव्हाचा साठा | ५९६० किलो | ८०,४६०/- |
| | | एकूण | ५,८०,४६०/- |

उपरोक्त वस्तूस्थिती पाहता, प्रस्तूत प्रकरणी सुनावणी होऊन सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकुण घेवून अंतिम निकालपत्र देण्यास विलंब लागणार असल्याने व प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला गहू हा पदार्थ नाशवंत असल्याने सदरचा पदार्थ आणखी काही काळ तसाच राहील्यास सदरचा गहू खराब होऊन शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे शिधापत्रिकाधारक त्यांचे देय कोटयापासून वंचित राहू नये म्हणून, तसेच शासन निर्णय क्र. ईसीए-१००९/प्र.क्र.३९९/ना.पु.२३, दि. १३ मे, २०१० अन्वये जप्त करण्यात आलेला गहू, तांदूळ, तुरदाळ, साखर व पामतेल या जीवनावश्यक वस्तू, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६ (अ) चे पोट कलम २ मधील तरतूदीनुसार शिधावाटप दुकानदारांना द्यावेत व शिधावाटप दुकानदारांनी सदरच्या वस्तू शासननियंत्रित दराने पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरित करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या गव्हाच्या साठयाबाबत, नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या तपासाच्या तसेच सदर प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्हयाच्या न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून अंतरीम आदेश पारित करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

<u>अंतरिम आदेश</u> :-

१) प्रस्तूत गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण १२० ब्राचकेमधील एकुण ५९६० किलो गव्हाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेला सदर गव्हाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे मदतीने त्यांचे कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) उपरोक्त कार्यवाही करतांना उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ यांनी उपरोक्त गव्हाचा साठा संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांच्या पुढील महिन्याच्या नियतनामध्ये दर्शविण्यात यावा.

४) प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या वरील मुद्देमालाव्यतीरिक्त शिल्लक राहीलेल्या मुद्देमालाबाबतचे आदेश या प्रकरणी सुनावणीची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर निर्गमित करण्यात येतील.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलिसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ हया लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मोटार ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ चे मालक
२) मोटार ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ चे चालक विदेशी राममिलन गौतम
३) प्रदीप शेठ, जप्त गव्हाचे मालक
४) गुप्ता ट्रेडिंग कंपनीचे मालक, घाटकोपर (पूर्व)
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मानखुर्द पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानखुर्द पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशात नमुद केल्याप्रमाणे सात दिवसाचे आत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा. सदरच्या कार्यवाहीस विलंब होवून गव्हाचा साठा खराब झाल्यास त्याची जबाबदारी आपल्यावर राहील, याची नोंद घ्यावी.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई.
~~५) निवड नस्ती.~~

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI